भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १८०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/०३/२०१७

**१) क्षुल्लक कारणावरुन कुऱ्हाडीने मनगटावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ११/०३/२०१७ चे १२.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी बाबुराव नथ्थुजी इटनकर वय ७५ वर्ष, रा. आंधळगाव हा आपल्या शेतावरुन घरी परत येत असतांना यातील आरोपी क्र. १ ते ३ हे नहराचे पाळीवर हजर होते त्यावेळी फिर्यादीचे सायकलला मातीचा ढेकुल अडकल्याने तो ढेकुल बाजुला केला असता यातील आरोपी क्र. १ ने फिर्यादीस तु मातीचा ढेकुल का उचललास असे बोलुन आपले हातातील कुऱ्हाडीने फिर्यादीचे डावे हाताचे मनगटावर मारुन जखमी केले व आरोपी क्र. २ व ३ यांनी पाय धरुन खाली पाडुन थापडबुक्याने मारपीट केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३२४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. दिक्षीत पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) महीलेच्या गळयातील बळजबरीने लॉकेट व गोप हिसकावुन नेल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ११/०३/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही सत्संगात असतांना कार्यक्रम संपल्यावर गर्दीत यातील आरोपी हीने फिर्यादीचे मागेहुन गळयात हात घालुन झटका मारुन गळयातील १ सोन्याचा गोप वनज २० ग्रॅम, सोन्याचा लॉकेट वनज १ ग्रॅम, असा एकुण ४२,०००/–रु. चा माल बळजबरीने चोरल्याने फिर्यादी सौ. पुष्पा फुंडे वय ५३ वर्ष, शास्त्री वार्ड वरठी यांचे तोंडी वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३९२ भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. फटींग पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे. आरोपी अटक आहे.

**३) अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १०/०३/२०१७ चे २१.०५ वा. दरम्यान यातील फिर्यादी तहसीलदार असुन ते रेती ने भरलेला ट्रक ची तपासणी करीत असता यातील आरोपी हा तीथे येवुन फिर्यादीस पैशाचे आमीष दाखवुन ट्रक सोडण्यास दबाव टाकुन शासकीय कामात अडथळा निर्माण करुन फिर्यादी व त्यांचे सोबत असलेले कर्मचारी यांना कशी काय गाडी अडवीली असे बोलुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सुखदेव खुशालराव वासणीक वय ५४ वर्ष, तहसील कार्यालय पवनी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,५०६(अ),१८६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) दारु पिवुन दारुचे नशेत बिना परवाना वाहन चालवितांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ११/०३/२०१७ चे ०१.१५ ते ०१.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी इकबाल शेख वानीशा भंडारा हे वाहतुक डयुटी करीत असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल ही मद्य प्राषण करुन वाहन चालवीतांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल अनॉलायझार मशीन व्दारे श्वासाची तपासणी केली असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने व वाहन चालवीतांना परवाना नसल्याचे निष्पन्न झाल्याने पोस्टे. भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. साबळे पोस्टे भंडारा हे करीत आहेत

५) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी .  :—

दिनांक ११/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. जवाहरनगर, मोहाडी, कारधा, करडी, तुमसर, सिहोरा आंधळगाव, गोबरवाही, साकोली, अडयाळ, व भंडारा येथे अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण २१ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २३६ लिटर हातभटटी दारु + सडवा ३० किलो साहीत्य किंमती १९,१२०/—रु. तसेच ३ लिटर ९६० मिली लिटर देशी दारु किंमती १,२८५/—रु. व जुगारातुन किंमती ६,४७२/—रू. असा एकुण किंमती २६,८७७/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.